**(डॉ. प्रजाबराव देशमुख निर्वाहभत्ता योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाकरीता करावयाचा अर्ज व नियमावली)**

दिनांक : / /

प्रति,

**मा. प्राचार्य तथा सदस्य सचिव,**
डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाहभत्ता योजना,
शासकीय तंत्रनिकेतन, बीड.

| पासपोर्ट साईझ फोटो |
|---|

**विषय : डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृहामध्ये प्रवेश मिळणे बाबत.**

अर्जदार : ------------------------------------------------

महोदय,

वरील विषयानुसार मी विनंती अर्ज करीत आहे की, उच्च व तंत्रविभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण – २०१८ प्र.क्र.२४९/१८/तांशि-४ दिनांक १३ जुलै, २०१८ व १० ऑगस्ट २०१८ मध्ये नमुद केलेल्या अटी मी पूर्ण करीत असून कृपया मला बीड येथे सुरू असलेल्या वसतिगृहामध्ये प्रवेश मिळावे ही नम्र विनंती.

माझी माहिती खालीलप्रमाणे असून त्याबाबत कागदपत्राची छायाप्रत सोबत जोडत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सन २०२४-२५ वर्षामध्ये प्रवेशित संस्थेचे बोनाफाईड | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| २. | शिकत असलेला अभ्यासक्रम व वर्ष | : **अभ्यासक्रम** |
| ३. | मागील वर्षाचे मार्कशीट | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ४. | सन २०२३-२४ चे उत्पन्न व त्याबाबतचे तहसीलदार यांचे प्रमाणपत्र अथवा पालकाचे आयकर नमुना १६ अ फॉर्म (रू. ८.०० लक्ष मर्यादे पर्यंतचे) | : **वार्षीक उत्पन्न रू.** |
| ५. | शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ६. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे मिळालेल्या प्रवेशाचे पत्र / सी.ई.टी. परीक्षेबाबतचे पत्र **(व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता)** | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ७. | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ८. | रेशनकार्डची छायाप्रत | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ९. | आधारकार्ड छायाप्रत | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| १०. | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असल्यास त्याबाबतचा सक्षम अधिकारी यांचा पुरावा | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| ११. | दिव्यांग असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचा पुरावा | : **सोबत जोडले आहे / नाही** |
| १२. | मूळ गाव बीड पासवून मूळ राहण्याचे ठिकाणाचे अंतर | : **गाव : अंतर कि.मी. :** |

१३. शासकीय रूग्णालयातील डॉक्टरांकडून प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे प्रमाणपत्र **: सोबत जोडले आहे / नाही**

स्वाक्षरी :

संपूर्ण नाव :

संपूर्ण पत्ता :

विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक :

**टिप : विद्यार्थ्यांनी वरील अर्ज पूर्णपणे भरून कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती अर्जासोबत जोडाव्यात तसेच पालकांचे प्रमाणपत्र जोडावे. अपुरे कागदपत्रे असलेच अर्ज बाद / रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

.................................................................................................................................................

## पालकाचे प्रमाणपत्र

वरील सर्व नियम मी वाचले असून माझा पाल्य वरील सर्व नियमाचे पालन करील अशी हमी देत आहे. जर माझ्या पाल्याकडून काही गैरवर्तणूक झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल या बाबत मला माहित आहे व त्यास माझी मान्य आहे.

स्वाक्षरी :

संपूर्ण नाव :

संपूर्ण पत्ता :

विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक :

दिनांक : / /

# विद्यार्थ्यांकरीता नियमावली

१. प्रवेशासाठी अर्ज करताना अर्जात खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल याची नोंद घ्यावी.
२. वसतिगहातील वास्तव्य कालावधीत संबंधित वसतिगृहाचे वार्डन यांची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा गैरवर्तणूक केल्यास प्रवेश त्वरित रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
३. चालू शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाची उपस्थिती किमान ७५ % असणे आवश्यक आहे.
४. विद्यार्थ्यांना ज्या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे ती संस्था ज्या शहरात असेल आणि असा विद्यार्थी त्या शहरात वास्तव्यास असेल तर त्या विद्यार्थ्यास वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी अपात्र समजण्यात येईल.
५. कोणतीही नौकरी करीत असलेला विद्यार्थी हा वसतिगृह प्रवेशास अपात्र ठरेल.
६. वसतिगृहाच्या पहिल्या सत्राचा सर्वसाधारण कालावधी १० जून ते ३० नोव्हेंबर व दुसऱ्या सत्राचा कालावधी ०१ डिसेंबर ते ३० एप्रिल असा राहील. तथापि अभ्यासक्रमानुसार यामध्ये बदल करण्यात येईल.
७. बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अनुक्रमे रू. २००० व रू. १००० प्रतिवर्ष निर्वाह भत्ता शासनाकडून अनुज्ञेय असल्याने संस्थेने निर्धारित केलेल्या फरकाची रक्कम विद्यार्थ्याने संसथेस देणे बंधनकारक राहील.
८. ज्या विद्यार्थ्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली निर्वाह भत्ता अनुज्ञेय नसेल अशा वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेतांना विहित करण्यात आलेले व देय असणारे शुल्क प्रत्येक सत्राच्या सुरूवातीस भरणे आवश्यक राहील.
९. व्यवस्थापनामार्फत विद्यार्थ्यांना खानावळीची सोय उपलब्ध करून दिल्यास खानावळीचे प्रत्येक महिन्याचे आगाऊ मासिक शुल्क व्यवस्थापनाकडे जमा करणे आवश्यक असेल.
१०. जर एक आवठवड्यापेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यास बाहेर जावयाचे असेल तर जाण्यापूर्वी त्याने व्यवस्थापन कार्यालयास लेखी कळविणे आवश्यक आहे. जर विद्यार्थी समाधानकारक कारण न देता गैरहजर राहिला व वसतिगृहाचे नियम तोडण्याचा प्रयत्न केला तर वसतिगृह प्रमुख त्या विद्यार्थ्यास खोली रिकामी करण्यास सांगू शकेल.
११. वसतिगृहात प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्याने वसतिगृहाचे नियम पाळणे आवश्यक आहे. व वसतिगृहातील एकूण वर्तणूक वसतिगृह प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असणे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.
१२. वसतिगृह चालवणारी संस्था वसतिगृहातील कोणत्याही विद्यार्थ्याचा गैरवर्तणूक / शिस्तभंग या कारणास्तव वसतिगृहातील प्रवेश संबंधित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक यांच्या सहमतीने रद्द करू शकतील.
१३. जर एखाद्या विद्यार्थ्यास संस्थे विरूद्ध / व्यवस्थापना विरूद्ध तक्रार असेल तर तो विद्यार्थी संबंधित जिल्हाधिकारी तसेच विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण / उच्च शिक्षण यांच्याकडे लेखी तक्रार करू शकेल.
१४. प्रत्येक विद्यार्थ्यास संस्थेच्या प्राचार्य / संचालकाकडून प्रत्येक सत्रात ७५% हजेरी बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसे नसल्यास या बाबतची सबळ कारणमिमांसा द्यावी लागेल.

**वरील सर्व नियम मी वाचले असून ते मला मान्य आहेत. मी कोणत्याही नियमाचा भंग करणार नाही याची हमी देतो.**

आपला विश्वासू,

स्वाक्षरी :

संपूर्ण नाव :

संपूर्ण पत्ता :

विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक :